# प्रकरण ४ थे

## उध्दवराव पाटील आणि त्यांनी चालविलेल्या विविध राजकीय चळवळी

# प्रकरण ४ थे

## उध्दवराव पाटील आणि त्यांनी चालविलेल्या विविध राजकीय चळवळी :

४.१ उध्दवराव पाटील यांचे कार्यक्षेत्र

४.२ संयुक्त महाराष्ट्राची चळवळ

४.३ उध्दवरावानी शेतक-यासाठी चालविलेल्या चळवळी

४.४ शेतमजूरासाठी त्यानी चालविलेल्या चळवळी

४.५ सहकारी चळवळीबद्दल त्यांचे मत

४.६ भूदान चळवळीबद्दल त्यांचे मत

# प्र क र ण ४ थे

## ४.१ उध्दवराव पाटील यांचे कार्यक्षेत्र :

उध्दवराव पाटील यांच्या राजकीय कार्यक्षेत्राचा जेंव्हा आपण विचार करतो तेंव्हा त्यांचे कार्यक्षेत्र हे खा-या अर्थाने मराठवाडयात व त्यातल्या त्यात उस्मानाबाद जिल्हयात दिसून येते. व्यापक दृष्टीने त्यांच्या कार्यक्षेत्राचा विचार केल्यास त्यांच्या कार्यक्षेत्राला मर्यादा घालणे बरोबर होणार नाही. कारण एकूण देशातील परिस्थिती लक्षात घेतली तर जे प्रश्न मराठवाडयाचे आहेत तेच थोडयाफार फरकाने संपूर्ण देशाचे आहेत. उध्दवरावानी आपल्या राजकीय कार्यक्षेत्राला विद्यार्थी दशेपासूनच सुरुवात केल्याचे दिसून येते.(१) उस्मानिया विद्यापिठात शिक्षण घेत असताना निजाम सरकारने आर्यसमाजाचे नेते नरेंद्रजीना जेंव्हा अटक केली तेंव्हा त्यांनी त्या अटकेचा निषेध व्यक्त करण्यासाठी आपल्या विद्यार्थी मित्रासमवेत एक दिवस शाळा बंद पाडली.(२)

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर व मराठवाडा संयुक्त महाराष्ट्रात सामील झाल्यावर त्यांचे कार्यक्षेत्र महाराष्ट्रभर झाले. हैद्राबादची विधानसभा तर त्यांनी शेतकरी व शेतमजूर यांचे प्रश्नावर प्रभावीपणे गाजविली. तेथे असताना कुळ कायद्याचा प्रश्न, लेव्हीचा प्रश्न, सिलींगचा प्रश्न यांना वाचा फोडण्याचे महत्वाचे कार्य केले. कॉम्रेड व्ही.डी. देशपांडे यांनी म्हटले आहे, " हैद्राबाद कुळ कायदा अधिक पुरोगामी बनविण्यामध्ये उध्दवरावांचे सहकार्य मोठया प्रमाणात लाभले." महाराष्ट्र विधानसभेत आल्यानंतर त्यांचे सर्वप्रथम लक्ष वेधून घेतले ते संयुक्त महाराष्ट्र

चळवळीने. या प्रश्नावर त्यांनी विधानसभा चांगलीच गाजवून सोडली. महाराष्ट्र विधासभेत त्यांनी शेतकरी व शेतमजूरांचे प्रश्न पोटतिडकेने मांडले. शेतीमालाला किफायतशीर भाव बांधून द्या ही मागणी करणारे ते महाराष्ट्रातील एकमेव कार्यकर्ते होते. या मागणीची यशवंतराव चव्हाणानी टर उडविली. परंतु हेच यशवंतराव चव्हाण शेती मालाचे भाव बांधून मिळाले पाहिजेत म्हणून निघालेल्या शेतकरी दिंडीत १९८० मध्ये सामील झाले व स्वत:ला अटक करून घेतली.(३)

विधानसभेत त्यांनी अनेक प्रश्नावर आपली परखड मते मांडली. त्यांच्या विचाराने सत्ताधारी पक्षातील माणसेही मंत्रमुग्ध होवून जात, रोजगार हमी योजना, एकाधिकार कापूस खरेदी योजना, मजुरांच्या वेतननिश्चितीचा प्रश्न, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न,शेतक-यांच्या कर्जाचा प्रश्न इत्यादी प्रश्नावर त्यांनी जोरदार आवाज शेतकरी कामगार पक्षाच्या मदतीने विधानसभेत उठविला. विधानसभेबाहेरही त्यांचे कार्यक्षेत्र चालूच असे. ते नुसते वक्ते नव्हते तर कृतीशील कार्यकर्ते होते. विधानसभेतील त्यांची भाषणे म्हणजे आमच्या कॅबीनेटचे ते विषय बनत होते असे पी. के. सावंत यांनी म्हटले होते.(४) त्यांनी सिमाप्रश्नी बेळगांव भागातही कार्य केले. त्यासाठी सिमाभागात त्यांना अनेक लढे उभे करावे लागले. त्यांना अटकही सरकारने केली होती. त्यांच्या सिमा भागातील कार्याचे प्रत्यंतर म्हणजे त्यांच्या अंतयात्रेला सिमा भागातून आलेल्या हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीवरून दिसते.

शेतीमालाला उत्पादन खर्चाच्या प्रमाणात किफायतशीर भाव बांधून देण्याच्या त्यांच्या मागणीचा आज कोठे सरकार विचार करीत आहे. सरकारला शेती हा उद्योग म्हणून एक ना एक दिवस स्विकारावा लागेल असे त्यांचे मत होते. भारताची संपूर्ण अर्थव्यवस्था

शेतीवर आधारीत आहे. दुर्दैवाने कॉंग्रेसने शेतीबद्दल ठोस असे धोरण स्विकारले नाही असे त्यांचे स्पष्ट मत होते. म्हणूनच त्यांनी या प्रश्नावर आपले अधिक लक्ष केंद्रीत केले होते. या प्रश्नावर त्यांनी विधानसभेत व विधानसभेबाहेर आवाज उठविला. शेतीप्रश्नाविषयी अचूक जाण असणारा त्यांच्या इतका तज्ञ माणूस शेतकरी कामगार पक्षात नव्हता.(५)

सर्वसामान्य माणसांच्याकरिता त्यांनी महाराष्ट्रभर अनेक लढे उभे केले. मराठवाडयाच्या नामांतराचे प्रश्नावेळी कॉंग्रेसच्या पुढा-यानी बोटचेपीचे धोरण स्विकारले परंतु त्यांनी आपली मते नामांतराच्या बाजूने परखडपणे मांडली.(६) त्यांच्या राजकीय कार्यक्षेत्राला विद्यार्थी दशेपासूनच सुरुवात झाल्याचे आपण पाहिले. सावकार चळवळी विरुध्द प्रथम त्यांनी आवाज उठविला. येथूनच त्यांच्या राजकीय जीवनाची वाटचाल सुरू झालेली दिसते.

विरोधी पक्षनेते, संयुक्त महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष ही त्यांची राजकीय जीवनातील कार्यक्षेत्रे खूपच गाजली. त्यांच्या विधानाला तात्वीक व वैधानिक विचाराची जोड असे. कार्लमार्क्स भारतीय परिस्थितीत जशाचा तसा रूजविता येणार नाही तर भारतातील परिस्थितीशी अनुसरूनच तो रूजविला येईल व यासाठी त्यांनी फार प्रयत्न केले.

## ४.२ संयुक्त महाराष्ट्राची चळवळ :

१५ ऑगष्ट १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले. परंतु भारतात असणारी संस्थाने संघराज्यात विलीन होण्याचा प्रश्न निर्माण झाला. वल्लभभाई पटेल सारख्या कुशल नेतृत्वाने संस्थानांचा प्रश्न निकालात

काढला. भारतातील घटक राज्याची रचना कशी असावी याबाबत ब्रिटीश असलेपासूनच लोकाकडून मागणी होत होती. १९१८ मध्ये भाषावार प्रांत पुनर्रचना झाली पाहिजे असा लोकमान्य टिळकांनी जाहीरनामा काढला होता. संयुक्त महाराष्ट्राची मागणी प्रथम १९३० साली महाराष्ट्र एकीकरण परिषादेमार्फत करण्यांत आली होती. महाराष्ट्र एकीकरण परिषादेचे अध्यक्ष डॉ. टी. जे. केदार होते. ते नागपूर विद्यापिठाचे कुलगुरु होते. बॅरिस्टर रामराव देशमुख हे संयुक्त महाराष्ट्राचे खरे पुरस्कर्ते होते. त्यांनी कॉंग्रेस पार्टीच्या लेजीसलेटीव्ह असेंब्लीमध्ये ब्रिटीश सरकारला मराठी भाषा बोलणा-या प्रदेशाचे संयुक्त महाराष्ट्र तयार करा अशी शिफारस केली होती.(७)

मराठी साहित्य सम्मेलन हे बेळगांव येथे १९४६ मध्ये भरविण्यात आले होते. या सम्मेलनाचे एका विभागाचे अध्यक्ष जी.डी. माडखोलकर हे होते. ते संयुक्त महाराष्ट्राचे उद्‌गाते होते. त्यांनी आपल्या भाषणात मराठी भाषिकांच्या महाराष्ट्राच्या एकत्रीकरणाचे महत्व सांगितले. मराठी भाषा असणा-यांचा एक प्रदेश असावा असे त्यांचे मत होते. व त्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत, आयुष्यभर मी संयुक्त महाराष्ट्र समितीचे कार्य करण्यास तयार आहे असे त्यांनी आपल्या भाषणात जनतेला आश्वासन दिले होते. या अधिवेशनामध्ये संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचा ठराव समाविष्ट करण्यांत आला. संयुक्त महाराष्ट्राची मागणी अस्तित्वात आणण्यासाठी पांच सदस्यांची महाराष्ट्र समिती निर्माण करण्यांत आली.(८)

where?

महाराष्ट्र समितीची पहिली बैठक २६ मे १९४६ ला भरविण्यात आली. त्यात असे ठरविण्यात आले की, मुंबईला परिषद घ्यावी. शंकरराव देवांच्या नेतृत्वाखाली २८ जुलै १९४६ रोजी महाराष्ट्र एकत्रीकरण परिषादेची बैठक मुंबई येथे भरली. त्या परिषादेमध्ये संयुक्त महाराष्ट्र परिषद स्थापन करण्यात आली.(९) आचार्य दादा धर्माधिकारी

यांनी महाराष्ट्र एकत्रीकरणाचा जो ठराव मांडला त्या ठरावाच्या बाजूनेच जवळजवळ सर्व नेत्यांची भाषणे झाली. केशवराव जेधे व शंकरराव देव या दोघामुळे बरीच कॉंग्रेस मंडळी या चळवळीत सामील झाली होती. १३ आणि १४ एप्रिलला शंकरराव देवांच्या नेतृत्वाखाली संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या प्रतिनिधींची बैठक जळगांव येथे भरली. जेधेही या बैठकीला उपस्थित होते. त्यावेळी असे जाहीर केले की, " व-हाड हा सुध्दा एक संयुक्त महाराष्ट्राचाच भाग आहे." महात्मा गांधी, सरदार पटेल, पंडीत नेहरू, राजाजी या मंडळीनी मुंबईसहीत संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला विरोध केला. भाषावार प्रांतरचनेमुळे भारताच्या छोटया छोटया विभागात विभागणी होईल जी भारताच्या ऐक्याला धोका निर्माण करणारी असेल असे त्यांना वाटत होते. स्वातंत्र्यपूर्व काळात कॉंग्रेसने मात्र भाषावार प्रांतरचनेला पाठींबा दिला होता. परंतु स्वातंत्र्यानंतर मात्र कॉंग्रेसने आपली भूमिका बदलली. (१०)

भाषावार प्रांत रचनेची मागणी विशेषत: दक्षिणेकडील राज्याकडून सारखी होवू लागली. तिने उत्तरोत्तर उग्र स्वरूप धारण केले. भाषावार प्रांत रचनेचे जे समर्थक होते त्यांनी राजेंद्र प्रसाद यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. ( २४ फेब्रुवारी १९४८ मध्ये ). लोकांच्या या आग्रही मागणीमुळे डॉ. राजेंद्र प्रसादानी धार यांच्या नेतृत्वाखाली एक कमिशन नेमले. या कमिशनला भाषावार प्रांत रचनेबद्दल मते देण्यास सांगितली. भाषावार प्रांत रचना करावयाची झाल्यास ती किती विभागात करता येईल याबाबत शिफारशी करण्याबाबत कमिशनला सूचना देण्यांत आल्या. धर कमिशनकडे दक्षिणे-कडील राज्यानी शिष्टमंडळे पाठविण्यास सुरुवात केली. संयुक्त महाराष्ट्र परिषदेने आपले अधिवेशन मुंबईत घेण्याचे ठरविले. हे अधिवेशन सर्व

पक्षांचे होते. बहुसंख्य लोक या अधिवेशनाला हजर होते. परंतु नजरेत भरणारी एक गोष्ट म्हणजे शंकरराव देव या अधिवेशनाकडे फिरकलेच नाहीत. रामराव देशमुख त्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. धार कमिशनचा अहवाल १९४८ मध्ये बाहेर पडला. भाषावार प्रांत रचनेची मागणी संकुचित मनाची आहे त्यामुळे देशाचे छोटया छोटया विभागात विघटन होईल त्यामुळे देशाच्या ऐक्याच्यादृष्टीने भाषावार प्रांत रचना मान्य करणे योग्य होणार नाही अशी मते कमिशनने व्यक्त केली. (११)

भारतीय संघराज्यात घटक राज्याची रचना कशी असावी याबाबत केंद्र सरकारने राज्य पुनर्रचना आयोग नेमला. या आयोगाचे अध्यक्ष फाजल अली होते व सदस्य हृदयनाथ कुंझरू व पण्णीकर होते. १० ऑक्टोबर १९५५ मध्ये आयोगाचा अहवाल प्रसिध्द होवून त्यात स्वतंत्र महाराष्ट्र राज्य निर्मितीची मागणी फेटाळून लावली. संयुक्त महाराष्ट्र राज्य निर्माण होवू नये आणि त्यामध्ये मुंबईचा समावेश होवू नये म्हणून, "धर कमिशन" व जवाहर-वल्लभ-पट्टाभी समिती यांनी जी महाराष्ट्र विरोधी भूमिका घेतली होती त्याच धोरणाची अंमलबजावणी फाजल अली समितीने केली होती. फाजल अली समितीचा अहवाल बाहेर पडला त्यावेळी महाराष्ट्रातील सर्व विरोधी राजकीय पक्षाच्या नेत्यानी मोठमोठया निषेधाच्या सभा घेवून त्या अहवालाचा धिक्कार केला होता. बेळगांवपासून जळगांवपर्यन्त हरताळ, मोर्चे, निदर्शने यांचा धुमधडाका सुरू झाला. " मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे " अशी सिंहगर्जना सर्वत्र निनादू लागली. १४ ऑक्टोबर १९५५ मध्ये दिल्ली येथे झालेल्या कॉंग्रेसच्या बैठकीत शंकरराव देव, यशवंतराव चव्हाण यांनी कॉंग्रेसच्या सभासदांनी आयोगाच्या अहवालाविरूध्द निदर्शनात भाग घेवू नये असा ठराव मंजूर करून घेतला होता. उलट आयोगाचा अहवाल लक्षात घेवून त्याला सहकार्य करावे असे सांगण्यात आले. (१२)

राज्य पुनर्रचना आयोगाचा निषेध करण्यासाठी एस. एम. जोशी यांनी १९५५ मध्ये मोर्चा काढला. आचार्य अत्रे व सेनापती बापट यांना मोरारजी सरकारने अटक केली. मोर्चामध्ये ५०० लोक सहभागी झाले होते. मोर्चावर लाठीहल्ला करण्यात आला. मोरारजी देसाई व एस. के. पाटील हे संयुक्त महाराष्ट्राच्या विरोधी होते. २० नोव्हेंबर १९५५ ला मोरारजी देसाई व एस. के. पाटील यांनी चौपाटीवर जाहीर सभा आयोजित केली होती. ही सभा उधळून लावण्याचा व तिच्यावर चप्पल फेक करण्याचा कार्यक्रम समितीच्या लोकांनी केला.(१३)

२१ नोव्हेंबर १९५५ ला फ्लोरा फाऊंटन मार्गावर लोक गोळा झाले. चार ते पांच लाख कर्मचारी आपल्या कामावर न जाता मोर्चात सहभागी झाले होते. मोर्चा चौपाटीकडे निघाला असता मोर्चावर लाठीहल्ला, अश्रुधुर व गोळीबार करण्यात आला. १५ लोक गोळीबारात मारले गेले, ३०० च्यावर जखमी झाले, शेवटी मोर्चा चौपाटीवर पोहोचला. सेनापती बापटांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली. या सभेला चार ते पांच लाख लोक होते. २३ नोव्हेंबरला सर्व पक्षाची बैठक शनिवार वाडयात मुंबईच्या गोळीबाराचा निषेध व्यक्त करण्यासाठी भरविण्यात आली होती. केशवराव जेधे, त्या बैठकीला हजर होते. त्यांनी आपल्या भाषणांत मुंबईत अस्थिरता निर्माण होण्यास स. का. पाटील व मोरारजी देसा… हेच कारणीभूत आहेत असे सांगितले.(१४)

१६ जानेवारी १९५६ रोजी नेहरूनी मुंबई … केंद्रशासित करण्याची घोषणा करण्यांत आली. ही घोषणा केली त्यावेळी महाराष्ट्रात जोरात निदर्शने चालू होती. देसाई सरकारने विरोधी पक्षातील नेत्यांची धरपकड सुरु केली. जवळजवळ ४५० कार्यकर्त्यांना प्रतिबंधात्मक स्थानबध्दतेच्या कायद्याखाली अटक केली. सगळीकडे उग्र

आंदोलने चालू होती. मोरारजी सरकारने ठिकठिकाणी गोळीबार केला त्यांत ९० माणसे ठार झाली. ही माणसे फक्त १६ जानेवारी ते २४ जानेवारी या दरम्यान केलेल्या गोळीबारात ठार झाली. गोळीबारात एकूण १०५ लोक ठार झाले होते तर ५५० जण जखमी झाले होते. दहा हजाराच्यावर लोकांना मोरारजी सरकारने अटक केली होती.(१५)

कॉंग्रेस पक्ष वगळता सर्व राजकीय पक्षानी एकत्र येवून संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना केली. "मुंबई, विदर्भ, मराठवाडा, बेळगांव, कारवार, निपाणीसह संयुक्त महाराष्ट्र निर्माण झालाच पाहिजे" अशा निर्धाराने समितीने आपल्या कार्याला सुरुवात केली. या समितीत सर्व विरोधी पक्षाचे सदस्य होते. ३० सदस्यांची ही समिती होती. एस. एम. जोशी तिचे सेक्रेटरी होते.(१६) १ ऑक्टोबर १९५६ रोजी शिवाजी पार्कच्या मैदानावर संयुक्त महाराष्ट्र समितीचे नेत्यांची परिषद भरली होती. महाराष्ट्र विदर्भ, मराठवाडा या प्रदेशातून समितीचे कार्यकर्ते हजर झाले होते. भाऊसाहेब राऊत, माधवराव बागल, बी. टी. रणदिवे, सेनापती बापट, नौशीर भरुचा, एस. एम. जोशी, आचार्य दोंदे, जयवंतराव टिळक, दत्ता देशमुख, यशवंतराव मोहिते, आनंदराव चव्हाण, केशवराव जेधे, सदाशिव बागाईतदार, लालजी पेंडसे, उध्दवराव पाटील, रघुनाथराव खाडीलकर, वि. ना. पाटील, माधवराव गायकवाड, प्र. के. अत्रे इत्यादी मातब्बर मंडळी परिषदेला हजर होती. महाव्दीभाषिक राज्याचा निर्णय कसा चुकीचा व अन्यायकारक आणि अव्यवहार्य आहे हे या नेत्यानी पटवून दिले व समितीच्या पुढील लढयाचे स्वरुप ठरले गेले.

उध्दवराव पाटील सुरुवातीपासूनच संयुक्त मह
अग्रेसर होते. त्यांनी हैद्राबाद विधानसभेत मराठवाडा हा
लादता महाराष्ट्रात सामील होईल असा एकमुखी ठराव
त्यांनी सिमाविषयक प्रश्नाच्या संदर्भात जी भूमिका घेतल

सर्वच राज्यकर्त्यांना मार्गदर्शक ठरणारी आहे. भाषावार प्रांतरचना ही मराठी जनतेच्या न्याय हक्काची चळवळ आहे ती कोणीही दडपू शकणार नाही असे त्यांचे मत होते. (१७)

मुंबईच्या प्रश्नामुळे महाराष्ट्र आणि गुजराथ यांचे मिळून व्दैभाषिक राज्य निर्माण झाले ते मोडून काढण्यासाठी संयुक्त महाराष्ट्र समितीला प्रखर आंदोलन उभे करावे लागले. अनेक मोर्चे आयोजित करावे लागले. या सर्व चळवळीमध्ये उध्दवराव आघाडीवर होते. त्यांनी लाखाचे मोर्चे संघटीत करुन विधीमंडळावर नेले. सिमाभागात सतत संचार केला. त्यांत त्यांना बंदिस्त करुन तुरुंगात ठेवण्यात आले. शेवटी महाराष्ट्रातील प्रखर बहुमत लक्षात घेवून दिल्ली सरकारने मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी मंजूर केली. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये अचूक मार्गदर्शन करुन चळवळ महाराष्ट्रव्यापी उभारण्यामध्ये त्यांनी मोलाची कामगिरी केली आहे. (१८)

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीबाबत त्यांनी दोन्ही आघाडीवर कार्य केले. विधानसभेत हा प्रश्न अत्यंत स्पष्टपणे व खंबीरपणे त्यांनी मांडला. त्याचबरोबर कायदे मंडळाच्या बाहेरही या चळवळीचे नेतृत्व इतर पक्षाबरोबर केले. १९५८ ला त्यांनी विरोधी पक्षाच्या समितीमुळेच विधानसभेत विरोधी पक्षनेते पद मिळाले होते. त्यावेळेस त्यांना विरोधी पक्षनेता म्हणून आपली भूमिका चांगल्या रितीने पार पाडली. नुकताच विधानसभेचा सोहळा पार पडला त्यात शरद पवारानी उध्दवरावांच्या कार्याचा उल्लेख केला आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीसाठी त्यांनी त्यांच्या आयुष्याचा फार मोठा कालखंड या कामासाठी खर्च केला आहे. (१९)

उध्दवरावाच्या नेतृत्वाचा आणि व्यापक विचारांचा

अविष्कार भाषिक राज्य पुनर्रचनेच्या काळात झाला. हैद्राबाद विधानसभेतच राज्याच्या विभाजनाचा ठराव मंजूर झाला होता. मराठवाडयातील सर्व विचारसरणीचे लोक मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र व्हावा यासंबंधी आग्रह धरून होते. संयुक्त महाराष्ट्रासंबंधी जेवढे सत्याग्रह झाले त्यात मराठवाडयाने हिरीरीने भाग घेतला आहे. संयुक्त महाराष्ट्र परिषदेपर्यन्त शंकरराव, भाऊसाहेब हिरे, धनंजयराव गाडगीळ प्रभुतीचे नेतृत्व होते. पुढे परिषदेचे दोन तुकडे पडले व डावे पक्ष वेगळे निघाले. त्यांनी परिषदे ऐवजी संयुक्त महाराष्ट्र समिती कायम केली. १९५७ च्या निवडणूकाही याच समितीच्या नांवावर लढविण्यात आल्या. समितीच्या काळात उध्दवरावांचे नेतृत्व आघाडीवर होते. संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न सुरूवातीपासून आजतागायत जरी सर्वांनीच लावून धरला असला तरी त्यासाठी प्रत्यक्ष संघटन व आंदोलन सिमा भागातील शेतकरी कामगार पक्षानेच केले. उध्दवरावानी या आंदोलनाचे नेतृत्व केले. दिल्लीपर्यन्त अनेकदा मोर्चे गेले व सत्याग्रह झाले.(२०)

समितीने दिल्लीला मोर्चा नेला होता. मोर्चाचे रूपांतर जाहीर सभेत झाले. संयुक्त महाराष्ट्राचे प्रश्नाबद्दल बिगर मराठी जनतेत बरेच गैरसमज होते. सभेला दिल्लीतील शिख व उत्तर भारतीय लोकांची उपस्थिती मोठया प्रमाणावर होती. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाची न्याय बाजू उध्दवरावानी अस्खालीत उर्दुत प्रभावीपणे मांडली. त्याला वारंवार उत्स्फुर्त दाद बिगर मराठी श्रोत्यांनी दिली.(२१)

उध्दवराव पाटील राजकारणात आले आणि थोडयाच दिवसात भाषावार प्रांतरचनेची चळवळ उभी राहिली. त्या चळवळीत त्यांनी भाग घेतला हे विशेष नाही परंतु मराठवाडयाबाबत जी भूमिका त्यांनी व त्यांच्या पक्षाने घेतली याबद्दल इतिहासात तोड नाही. मराठवाडयातील पुढा-यांनी उलट महाराष्ट्रीत मराठवाडयातील

जास्तीत जास्त प्रदेश सामील करून घेण्यासाठी स्वच्छ लोकशाही भूमिका घेतली. भाषावार प्रांत रचना ही कांही कोणाचे राज्य करण्यासाठी नव्हती तर मराठी जनतेच्या लोकशाही हक्काची चळवळ होती. या चळवळीपुढे १९६० साली काँग्रेस पुढा-यांना मान तुकवावी लागली. परंतु त्यातून सिमा प्रश्न शिल्लक राहिला. काँग्रेसवाल्यांचा संधीसाधूपणा व संयुक्त महाराष्ट्र समितीतील पुढा-यांचा बोटचेपेपणा हा शेवटी नडला. चिंतामणराव देशमुख यांचा राजिनामा त्यामुळे वाया गेला. महाराष्ट्रातील जनतेला सीमा प्रश्नासाठी पुन्हा चळवळ उभी करणे भाग पडले.(२२)

१९५७ साली झालेल्या विधानसभेच्या निवडणूकीत आण्णासाहेब गव्हाणेंच्या नेतृत्वाखाली उध्दवरावानी शेतकरी कामगार पक्षाला मराठवाडयात चांगले यश मिळवून दिले. १९६७ च्या निवडणूका सीमा प्रश्नावर लढविण्याचे ठरविले. संयुक्त महाराष्ट्र सीमा समितीचे अध्यक्ष पद उध्दवरावाना देण्यात आले. त्यावेळी त्यांनी काँग्रेसला महाराष्ट्रात जबरदस्त हादरा दिला होता. सीमाप्रश्नाची चळवळ सतत चालू ठेवण्यामध्ये उध्दवरावानी फार प्रयत्न केले आहेत. महाराष्ट्र निर्मितीनंतर समितीत फूट पडली. परंतु सीमा लढा समिती शिल्लक राहिली. त्या समितीने हा प्रश्न हाती घेतला. या समितीच्या सर्व कामकाजात उध्दवराव पाटील, व्ही. डी. चितळे, दत्ता देशमुख, एस.एम. जोशी यांनी जीवाचे रान केले. या समितीच्या वतीने "साराबंदी लढा" हा ऐतिहासिक लढा संघटीत करण्यात आला. दोनवेळा महाराष्ट्रातील व सीमा भागातील हजारो कार्यकर्त्यांनी सत्याग्रहात भाग घेवून तुरूंगवास पत्करला. साराबंदी लढा हा सर्वांवर कळस होता. या लढयात सीमा भागातील १०० खेडयातील शेतकरी सामील झाले होते. हे घडवून आणण्यात उध्दवरावांचा फार मोठा वाटा होता. येलूर गावाला पोलीसांचा वेढा पडला असताना पोलीसांचे हात रोखण्यासाठी उध्दवराव

पुढे आले. त्या दिवशी त्यांना पकडण्यात येवून दोन महिने तुरुंगात टाकण्यात आले. येलूर गावावर आलेला घाला आणि ४ उध्दवरावानी प्रतिकारासाठी टाकलेले पाऊल येलूरचे लोक कधीही विसरणार नाहीत. सीमा लढयात त्यांनी एवढेच काम केले नाही तर बेळगांव कारवार या जिल्ह्यातील अनेक संशयात्म्याचे आत्मे शांत केले. समितीच्या इतर पुढा-याबरोबर दौरे काढले. सिमा लढयातील सुसंगत व शास्त्रशुध्द भूमिका घेणारे समितीमधले ते एकच पुढारी होते नि आहेत.(२३)

संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न हा अर्धवट सुटला याची खंत त्यांना अखेरपर्यन्त होती. सीमाभागातील मराठी बांधवाना आपण न्याय मिळवून देवू शकलो नाही असे त्यांना सतत वाटत राहिले होते. आपल्या सत्काराला उत्तर देताना ते म्हणाले होते, संयुक्त महाराष्ट्र लढयामध्ये मुंबईबद्दल सर्व विरोधी पक्ष व सत्ताधारी पक्ष यात मतभेद होते. परंतु बेळगांव, कारवार व निपाणी या भागाबद्दल कोणाच्यातही मतभेद नव्हते असे असताना मात्र मुंबईचा प्रश्न ताबडतोब सुटला व ज्या प्रश्नाबाबत मतभेद नव्हते तो प्रश्न मात्र अजून तसाच राहिला. हा प्रश्न सुटल्याचे पाहण्याचे भाग्य मला लाभावे. " जीवात जीव असे पर्यन्त मी सिमा भागातील लोकांचा प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करीत राहीन " असे त्यांनी लाखो लोकांच्या जमलेल्या जनसमुदायासमोर सांगितले.(२४)

## ४.३ उध्दवरावानी शेतक-यासाठी चालविलेल्या चळवळी :

उध्दवराव पाटील हे मराठवाडयातील शेतकरी कामगार पक्षाचे नेते मानले जातात. त्यांचे शिक्षण व कार्य यानी मराठवाडयाशी त्यांचा संबंध आलेला आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाले परंतु हैद्राबाद संस्थान भारतीय संघराज्यात सामील झाले नव्हते. ते सामील करुन

घेण्यासाठी तेथील जनतेने स्वातंत्र्य संग्रामाचा लढा पुकारलेला हे आपण मागे पाहिलेले आहेच. निजाम राजवटीत शेतक-यावरती मोठ्या प्रमाणात जुलूम होत होते. शेतसारा सर्व ठिकाणी सारखा नव्हता ,कांही ठिकाणी तो जाचक होता. तो सर्व ठिकाणी सारखा व्हावा, शेतसा-याचे समानीकरण व्हावे यासाठी त्यांनी प्रयत्न केले. शेतसारा माफ करुन ॲग्रीकल्चर टॅक्स बसवावा, रयतवारी पध्दत रद्द करावी, उत्पादनाच्या पध्दतीनुसार आकारणी व्हावी या मागण्या त्यांनी केल्या व त्यासाठी खूप प्रयत्न केले. (२५)

मराठवाडयात सावकारशाहीचे फार प्रस्थ होते. बहुसंख्य शेतकरी हा सावकाराच्या कर्जात बुडालेला असावयाचा. सावकाराचे घेतलेले कर्ज भयंकर व्याजामुळे त्याला फेडणे होत नसे त्यामुळे त्याच्या जमिनी सावकाराकडे गहाण पडलेल्या असत. शेवटी सावकाराच्या कर्जापायी त्याला जमीन विकावी लागत असे. अशात-हेने तो भूमीहीन होत असे. पश्चिम महाराष्ट्रापेक्षा मराठवाडयात सावकारीचा प्रश्न फार मोठा होता. (२६) उध्दवराव नुकतेच वकील होवून बाहेर पडल्यानंतर त्यांनी लातूर येथे १९४६ मध्ये महाराष्ट्र परिषदेचे अधिवेशन होणार होते ते होवू देणार नाही असा पवित्रा घेतला कारण या अधिवेशनाच्या स्वागत समितीचे अध्यक्ष पद उस्मानाबादच्या फुलचंद गांधी या सावकाराला मिळणार होते. भक्षक हा रक्षक नसतो हे पत्रक काढून त्यांनी वाटले. त्यांच्या तरुण मित्रानी त्यांना चांगली साथ दिली. शेवटी फुलचंद गांधीना येथुनपुढे सावकारी करणार नाही हे जाहीर सभेत सांगावे लागले. अशारितीने त्यांनी हा पहिला विजय मिळविला. (२७)

Repetition?

मराठवाडयात लेव्हीचा फार मोठा प्रश्न होता. शेतक-याकडे धान्य असो अथवा नसो त्याने लेव्ही घातली पाहिजे, त्याला

घर खर्चासाठी धान्य शिल्लक राहील की नाही हे पाहिले जात नसे उलट पोलीसांच्या मदतीने त्याचे सर्व धान्य सरकार घेवून जात असे. या लेव्ही पध्दतीमुळे शेतकरी हैराण झाला होता. उध्दवरावानी या लेव्ही प्रश्नी लक्ष घालून शेतक-यावरती अन्याय करता येणार नाही असे सरकारला सांगितले. मराठवाडयात जमीनदारी, सरंजामदारी ठेवावयाची नाही यासाठी मराठवाडयातील सुशिक्षित तरूणानी या प्रश्नाला मोठी चालना दिली. पुढे यातील कांही कॉंग्रेसमध्ये गेले व कांही शेतकरी कामगार पक्षामध्ये गेले.(२८)

मराठवाडयात जमीनदारी व सरंजामदारी मोठया प्रमाणात होती. या वर्गाला निजामाचा आशिर्वाद होता. लहान शेतकरी व कुळाची हालत गंभीर होती. कुळांना कुठल्याही प्रकारचे संरक्षण नव्हते. मालकाने जेवढे धान्य देईल त्यावरच त्याला समाधान मानावे लागत असे. उध्दवराव हैद्राबाद विधानसभेत निवडून गेल्यानंतर सर्व विरोधी पक्षाबरोबर शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने कुळांना संरक्षण देण्याचा प्रयत्न केला गेला. त्यासाठी हैद्राबाद सरकारने कुळ कायदा केला. उध्दवरावांच्या प्रयत्नामुळे हैद्राबाद कुळकायदा अत्यंत पुरोगामी स्वरूपाचा बनविण्यात यश आले असे अनंतराव भालेराव यांचे मत आहे.(२९)

हैद्राबाद संस्थानात जमिनीची कमाल जमीन धारणा मर्यादा १४५ एकर होती ती १०८ एकर करण्यास त्यांनी सरकारला भाग पाडले.(३०)

हैद्राबाद संस्थानात जमिनीची कमाल व किमान मर्यादा, व्यक्तीगत शेती मशागत, शेतीचे व्यवस्थापन, कुळांचे संरक्षण व शेवटी जमीनीचे कुळाकडे हस्तांतरण या गोष्टीवर मराठवाडयातील डाव्या पक्षाच्या शेतकरी क्षेत्रातील वर्गीय संघटना या सर्व गोष्टीवर भर देवू लागल्या होत्या.

तेलंगणातील साम्यवादी चळवळीचा फार मोठा दबाव एकूण परिस्थितीवर होता. हैद्राबाद कुळकायद्याच्या संदर्भातील उध्दवराव व त्यांच्या सहका-यांची कामगिरी उल्लेखानीय ठरते. (३१)

मराठवाडा मुंबई राज्यात सामिल झाल्यानंतर उध्दवरावांनी शेतक-यांच्या प्रश्नासंबधी विधान सभेत व विधान सभे बाहेरही आवाज उठविला. उध्दवराव मुळातच शेतकरी कुटुंबात जन्मलेले असल्यामुळे त्यांना शेतक-यांच्या जिवनाची यथार्थ कल्पना होती. लोकसभे मध्ये खासदार असतांना ते आपल्या घरी कोणत्या वेळी कोणती पिके घ्यावीत तसेच कुठल्या शेतामध्ये कुठले पिक चांगले येवू शकेल हे पत्राने कळवित असत. राजकारण करीत असताना सुध्दा त्याचे लक्ष शेतीकडे असावयाचे यावरुन त्यांचा पिंड शेतक-याचा होता हे दर्शवितो (३२)

महाराष्ट्र विधान सभेत सरकारकडून जमिन सिलींग बद्दल कायदा आणला जात असतांना त्यांनी आपली मते अतिशय परखडपणे मांडली आहेत. शेती व्यवसाय हा आपल्या अर्थ व्यवस्थेचा पाया आहे. समाजवादाचा मंत्राघोष करणा-या सरकारने शेती कसणा-याला जमिनीपासून दूर ठेवले आहे तर दूसरीकडे जमिन धारणा कायद्यात अनेक छिद्रे ठेवून सरंजामी अर्थ व्यवस्था सरकारने जतन केली आहे असे त्याचे स्पष्ट मत होते. जोपर्यंत समानतेच्या तत्वावर जमीनधारणा कायद्याची काटेकोर पणे अंमलबजावणी होत नाही तोपर्यंत जमिनदारी खा-या अर्थाने नष्ट होणार नाही. असे त्याचे प्रांजळ मत होते. जमीन धारणा कायद्याने जर जमीनीचे होणारे केंद्रीकरण कायम राहणारे असेल तर या विधेयकाचा उपयोग तरी काय असा प्रश्न त्यांनी सरकार पुढे उभा केला. या पध्दतीचा अवलंब केल्यास हा भांडवलशाही पध्दतीकडे

जाण्याचा मार्ग ठरेल, या पध्दतीमध्ये लहाव लहान शेतकरी त्यांची इच्छा असो वा नसो ते एलीमिनेट होत जातात. मार्केट मध्ये ते टिकाव धारु शकत नाहीत म्हणून जमिन धारणा कायद्याची काटेकोर अंमलबजावणी सरकारने केली पाहीजे. कसेल त्याची जमीन हे तत्व अमलात आणले पाहिजे. असे त्याचे मत होते. (३३)

सरकार दरवर्षी शेतक-याला अल्प बचतीत पैसे गुंतविण्यास सक्ती करते. अल्प बचत ही जरी चांगली गोष्ट असली तरी त्यामागे सक्ती नको असे त्याचे मत होते. सरकार कलेक्टर किंवा तहसिलदार यांना कोटा ठरवून देणे व हे अधिकारी शेतक-यावर सक्ती करतात त्यामुळे या चांगले योजनेबद्दल लोकात नाराजी होते म्हणून त्यांनी सरकारी अधिका-याऐवजी सामाजिक कार्यकर्त्यावर हे असे काम सोपवावे म्हणजे ते शेतक-याला या योजनेचे महत्व पटवून देतील व शेतकरी मग या योजनत पैसे गुंतवतील असे सांगितले सध्याची पध्दत एकदम बंद करावी अशी सुचना त्यांनी सरकारला केली. (३४)

पिक आणेवारी ठरविण्याच्या पध्दतीवरही त्यांनी विधान सभेत आवाज उठविला. पिकाची आणेवारी ठरविण्यासाठी अधिकारी मोटारीतून जातात आणि मोटारीत बसल्या बसल्याच आणेवारी निश्चित करतात. त्यामुळे खरी आणेवारी लागत नाही असे त्याचे मत होते. अधिका-यांनी जर प्रत्यक्ष स्पॉटवर जावून धान्याची कणसे पाहिल तर खरी आणेवारी लागेल. व त्याप्रमाणे तातडीने उपाय योजना करणे आवश्यक आहे. ज्या ठिकाणी पिकाची आणेवारी कमी आहे तेथे सरकारने ताबडतोब काम सूरु करावे हे जर केले नाही तर शेतकरी भिक मागण्यापलीकडे व शेतीची अवजारे विकण्यापलीकडे कांही करु शकत नाही तेव्हां सरकारने त्याच्यां परिस्थितीकडे तातडीने व जिव्हाळ्याने

लक्ष देणे गरजेचे आहे. त्यांना सारा माफी देणे, तगाईचे हप्ते तहकुब करणे, व लोकांना तातडीने काम पुरविणे या गोष्टी करणे आवश्यक आहे. लोकांना कामावर योग्य मजुरी द्यावी, किमान त्याला माणूस म्हणून जगण्यासाठी आवश्यक असलेली मदत द्यावी. हे काम सरकारने ताबडतोब सुरु केल पाहिजे असे त्यांचे मत होते.(३५)

महाराष्ट्रातील शेतक-यांची एकंदर परिस्थिती पाहिल्यानंतर त्यांनी व त्यांच्या पक्षाने महाराष्ट्रात रोजगार हमी योजना राबवण्याबाबत १९५७ पासून आग्रह धरला होता. परंतु सरकारने त्याला दाद दिली नव्हती. परंतु पक्षाकडून सातत्याने मागणी होत होती. या मागणीला जोर चढला तो १९७२ च्या दुष्काळामुळे शेतकरी कामगार पक्षातर्फे महाराष्ट्रात अनेक ठिकाणी हजारोंच्या संख्येने मोर्चे काढले. वैराग, इस्लामपूर येथे काम मागणा-या लोकावर गोळीबार झाला. उध्दवरावांनीही स्वत:च्या नेतृत्वाखाली पंधरा हजार शेतक-यांचा मोर्चा जिल्हा कचेरीवर नेला होता. त्यावरही लाठीहल्ला, अश्रुधुराचा वापर केला. परंतु याचे पडसाद विधानसभेत उमटले. विरोधी पक्षाने विधानसभेचे कामकाज सतत सात दिवस बंद पाडले. त्याचा परिणाम म्हणून सरकारने महाराष्ट्रात रोजगार हमी योजना लागू केली. महाराष्ट्र हे भारतातले पहिले राज्य आहे की जेथे रोजगार हमी योजना लागू आहे. ही लागू करण्यांत उध्दवरावांचा फार मोठा वाटा होता.(३६)

आज महाराष्ट्रात शेतकरी संघटनेमार्फत शेतीमालाला भाव बांधुन द्या ही मागणी मोठया प्रमाणात करण्यांत येवू लागली आहे. परंतु हीच मागणी सुमारे ३५ वर्षापूर्वी शेतकरी कामगार पक्षातर्फे

करण्यांत आली होती. मुंबई विधानसभेत उध्दवरावानी हा प्रश्न उपस्थित केला, शेतीमालाला किफायतशीर भाव बांधून दिले पाहिजेत. तेंव्हा या मागणीची तेंव्हाचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी टर उडविली. परंतु हेच यशवंतराव चव्हाण १९८० मध्ये विरोधी पक्षाने आयोजित केलेल्या शेतकरी दिंडीमध्ये सामील झाले व शेतीमालाचे भाव बांधून दिले पाहिजेत अशी मागणी करु लागले. या दिंडीत सामील झाल्याबद्दल त्यांना अटकही झाली. शेतीमालाला किफायतशीर भाव बांधून दिले पाहिजेत अशी मागणी करणारे उध्दवराव हे पहिले बहुजन समाजाचे होते.(३७)

भारतीय अर्थव्यवस्थेची रचना भांडवलदारी स्वरुपाची झाली आहे. सरकारने उद्योगधंद्याला अधिक महत्व दिले परंतु कृषिप्रधान असणाऱ्या भारत देशातील शेतकऱ्याकडे सरकारचे अजिबात लक्ष नाही. जोपर्यन्त उत्पादन खर्चाच्या प्रमाणात शेतमालाला भाव मिळणार नाहीत तोपर्यन्त भारतीय शेती ही तोटयात राहणार आहे. सरकारच्या या धोरणामुळे खेडयात रोजगार उपलब्ध होत नाही. त्यामुळे सहाजिकच खेडी ओस पडणार व शेती व्यवसायाच्यादृष्टीने मजूर समस्या निर्माण होतील. कुशल कामगाराइतके वेतन अकुशल कामगाराला दिले पाहिजे. शेतीमालाचे खरेदी विक्रीमधील दलाल पध्दती नष्ट झाली पाहिजे. याबद्दल त्यांनी विधानसभेत व विधान-सभेबाहेरही आवाज उठविला.(३८)

शेतकऱ्याच्या प्रश्नाविषयी उध्दवरावानी विधानसभेत व विधानसभेबाहेर अनेक मौलीक विचार मांडले. शेतसारा रद्द करावा ही मागणी केली. इतर उद्योगधंद्यासाठी सरकार मात्र सर्व सोयी उपलब्ध करुन देते, मात्र शेतकऱ्यासाठी सरकार कोणत्याही प्रकारची

हमी देत नाही. शेतक-याच्या मालाला भाव नाही, तंत्रज्ञ नाही यामुळे शेती व्यवसाय हा तोटयात चालतो असे त्यांचे मत होते. शेतक-याचे आर्थिक सामर्थ्य वाढले तरच त्याची क्रयशक्ती वाढेल. सरकारने उद्योगधंद्याप्रमाणे विविध स्वरूपाच्या सवलती देवून या व्यवसायाचे औद्योगिकरण केल्यास शेती व्यवसायाची प्रतिष्ठा वाढेल असे उध्दवरावांचे मत होते. शेती व्यवसायात गुंतविलेले भाग भांडवल निश्चित काळात परत मिळेल याची खात्री नसते यामुळे दुसरा व्यवसाय चालू करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. म्हणून शेतीव्यवसायाला हमी मिळाल्यावर आणि त्यासाठी योग्य भाव देताना उत्पादित खर्च अधिक नफा याचा विचार करूनच तो भाव बांधून द्यावा लागेल.(३९)

शेतक-याला दिली जाणारी कर्जे ही दीर्घ मुदतीची आणि बिनव्याजी असली पाहिजेत. घेतलेल्या कर्जाची फेड करावयाची म्हणजे कर्ज खर्च केल्याने उत्पादन वाढले पाहिजे, या वाढीव उत्पादनातून शेतक-याचे जीवनमान व उत्पादित खर्च वजा जाता जो नफा राहील त्यातूनच कर्जाची परतफेड शेतकरी करणार, असे त्यांचे मत होते. सरकार आजारी उद्योगधंद्याना विविध सवलती देते परंतु नैसर्गिक आपत्ती आल्यास मात्र सरकार शेतक-यांना सवलती देत नाही याचे मुख्य कारण म्हणजे शेतक-यांची विविध स्तरावर संघटना नसल्यामुळे त्यांच्या प्रश्नाची सरकार गंभीरपणाने दखल घेत नाही असे त्यांचे स्पष्ट मत होते. सरकारने शेती व्यवसायाची औद्योगिक क्षेत्राशी सांगड घालून शेतीसाठी भांडवल पुरवठा करणे, बाजारपेठ उपलब्ध करून देणे, शेतीला संपूर्ण हमी देणे इत्यादी गोष्टी केल्या तरच शेतीला उज्वल भवितव्य आहे अन्यथा या देशात शेतीची बिकट अवस्था झाल्याशिवाय राहणार नाही. उद्योगपती मात्र

स्वत:च्या वस्तुचे भाव ठरविती. परंतु शेतक-याला मात्र त्याने निर्माण केलेल्या धान्याचे भाव ठरविता येत नाही अशी खंत त्यांना सारखी वाटे. एवढेच नव्हे तर प्राईस कमिशनवर शेतक-याचा एकही मनुष्य नसतो. तसेच ज्याला शेतीचा गंध नाही अशाकडून अन्नधान्याच्या किंमती निश्चित होतात.(४०)

महाराष्ट्रातील ब-याच भागात सातत्याने दुष्काळी परिस्थिती असल्याने तेथील शेतक-याचे जीवन अतिशय निकृष्ट अवस्थेत जात आहे. सरकारने जुने कायदे बदलून नविन दृष्टीकोनांतून विचार केला पाहिजे. मे १९७० रोजी विधानसभेत भीषण दुष्काळा संबंधी मांडलेल्या प्रस्तावावर त्यांनी आपले विचार अतिशय परखडपणे मांडले आहेत.ते विचार म्हणजे शेती विषयाचे मुलभूत विचार मानावे लागतील.दुष्काळ निवारण उपायात पशुधन सांभाळले जावे एवढया सवलती शेतक-यास दिल्या पाहिजेत. दुष्काळी परिस्थितीत शेतक-याच्या कर्जाची वसुली तहकुब केली जाते. परंतु पुढील वर्षी वसुल केली जाते. त्याऐवजी त्याला माफी देण्यांत यावी. दुष्काळावर मात करताना सरकारने त्याच परिसरातील शेतक-यांना उपयुक्त ठरतील अशा कार्यक्रमावर भर दिला पाहिजे. सरकारने हंगामी स्वरूपाची कामे न करता कायम स्वरूपी व उत्पादक कामे हाती घेणे आवश्यक आहे ज्यायोगे राष्ट्रीय उत्पादन वाढीस हातभार लागेल व सरकारचा हेतुही सफल होईल. दुष्काळाच्या संकटात सापडलेल्या शेतीचा वेगवेगळ्या दृष्टीने विचार करून शेतक-यांना समर्थ बनविण्याचा प्रयत्न झाला तरच भविष्यकाळात शेती व्यवसाय स्वयंपूर्ण व किफायतशीर बनेल. अन्यथा हाताच्या बोटावर मोजण्या इतके शेतकरी वगळले तर इतरांचे रूपांतर शेतमजूरामध्ये होवून जाईल असे त्यांचे मत होते. (४१)

शेती व्यवसाय पूर्णत: निसर्गावर अवलंबून असल्यामुळे सरकारने शेती व्यवसायाला सुरक्षितता मिळवून दिली पाहिजे. यासाठी सरकारने पीक विमा योजना हाती घ्यावी असे त्यांचे मत होते. उद्योगधंद्याना विम्याचे संरक्षण मिळू शकते, नोकराना सर्वप्रकारची शाश्वती मिळते परंतु जो रात्रंदिवस काबाडकष्ट करतो उन्हामध्ये घाम गाळतो त्यांना मात्र कसल्याही प्रकारची सुरक्षितता सरकारने दिलेली नाही. ज्यांच्या मतावर आपण निवडून जातो त्यांच्या वेदनेचा विचार राज्यकर्त्यांनी व समाजातील विचारवंतानी केला नाही तर देशातील हा वर्ग क्रांती केल्याशिवाय राहणार नाही असे त्यांचे स्पष्ट मत होते.(४२)

देशात सर्वत्र सिलींगच्या बाबतीत एकवाक्यता आढळून येत नाही. सामाजिक न्याय देण्यासाठी सरकारने जमिनधारणेचा कायदा आणला होता. पर्सनल कल्टीव्हेशनची व्याख्या बदलली पाहिजे असे त्यांचे मत होते. परंतु तीन बदलल्यामुळे भाऊ, बायको, भाचा, मुलगा, मुलगी यांच्या नांवाने जमीन वाटप करून त्यांना कायद्याप्रमाणे न्याय दिला परंतु गरिब शेतक-याला जमीन हवी होती ती त्याला मिळाली नाही. कायद्यातील पळवाटांचा फायदा त्यांना मिळाला. अशाप्रकारच्या पळवाटा असणारा कायदा सरकारने केला. ज्या जमिनीत शेती करणा-यांचे पाय लागतात त्याच शेतीत उत्पादन वाढ होते हे लक्षात घेतले पाहिजे " वासराने ढुशी मारल्याशिवाय गायीला पान्हा फुटत नाही " त्याप्रमाणे मालकाचे पाय जेंव्हा जमिनीला लागतात तेंव्हाच जमीनीतून येणारे उत्पन्न वाढते. आज ज्यांच्या ज्यांच्या नावावर जमीनी आहेत त्यांचे पाय त्यांच्या जमीनीला लागतात काय हा खरा प्रश्न आहे. आज अनेक कुटुंबाकडे जमीनीचे क्षेत्र फार मोठे आहे. त्यामुळे शेतीपासून मिळणारे उत्पन्न घटत आहे. शेतीवर स्वत: मेहनत करणारे शेतकरी चांगल्या प्रकारचे

उत्पादन काढू शकतात असे चित्र महाराष्ट्रात दिसत असताना या राज्यात सीलींग कमी करण्यात भय कां असा प्रश्न त्यांचेसमोर उभा राहतो.(४३)

## ४.४ शेतमजूरासाठी त्यांनी चालविलेल्या चळवळी :

शेतकरी कामगार पक्षाने शेतमजूरांच्या प्रश्नाला हात घातला नाही. त्यांच्या संघटना बांधाल्या नाहीत हा ठराविक आरोप केला जातो. परंतु त्यांचे असे मत होते की, शेतमजूरांच्या वेतनाकरिता आंदोलन करण्याची वेळ आलेली नाही. शेतमजूर हा सामाजिक व आर्थिकदृष्टया गावच्या समाज रचनेत अडकून पडला आहे. समाजाच्या इतर वर्गात त्यांचे हितसंबंध गुंतले आहेत. श्रीमंत व मध्यम शेतक-यांच्या शेतात तो काम करतो. शेतमजूरांच्यात स्पृश्य व अस्पृश्य असे दोन गट पडतात. शेतमजूरांच्या वेतनासाठी आंदोलन सुरु केले तर गावच्या सामाजिक परिस्थितीमुळे शेतमजूरात हरिजन व हरिजनेतर शेतमजूर अशी विभागणी होते. शेतमजूरांचे आंदोलन सुरू झाले तर त्या गावातील जमीन मालक सामाजिक परिस्थितीचा फायदा घेवून शेतमजूरामध्ये गट पाडतात. त्यामुळे शेतमजूरांच्यातच संघर्ष होण्याचा धोका आहे. शेतमजूरातील फाटाफुटीमुळे चळवळीला आधार रहात नाही.शेतमजूरातील ही फूट टाळून त्यांना रोजगारांची हमी मिळावी याकरिता सरकारमार्फत योजना राबविली पाहिजे हा आमचा आग्रह राहिला आहे या दाजिबा देसाईंच्या मतांचे उध्दवराव समर्थक होते.(४४) सरकारने रोजगार हमी सुरु केली पाहिजे यासाठी त्यांनी आग्रह धरला. रोजगार हमीवर जी मजूरी मिळते ती शेतक-याला आपोआपच शेतमजूराला द्यावी लागेल अन्यथा रोजगार हमी योजना सोडून तो शेतक-याच्या कामावर येणार नाही असे त्यांचे मत होते.

उध्दवरावांना श्रमीक आणि कार्यकर्ते भेटावयाला आले की त्यांचा पट्टा खेडयातल्या सामाजिक, धार्मिक, राजकीय संबंधापासून तो आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील भावापर्यंन्त चालतो. त्यांची मते श्रमीकांच्या राजकारणाबाबत अगर धनिकांच्या डावपेचाबाबत अगदी निश्चित असतात. त्यांचे ठोकताळेही निश्चित असतात. चळवळीच्या एखाद्या समर प्रसंगात ऐनवेळी बरोबर मार्ग शोधण्यात त्यांचा इतका परहित नेता मला दिसला नाही असे दाजिबा देसाईंचे मत होते. चळवळी-मध्ये योजना करावी लागते ही गोष्ट खरी आहे पण ही चळवळ धनिकांच्या विरूध्द अगर सरकारच्या विरूध्द असते. त्यांच्या डावपेचाच्या तोडीसतोड देणे यात उध्दवरावांचे कसब टिपून ठेवण्यासारखे आहे. नवीन कार्यकर्त्यांनी त्यांचे पठण केले तरी त्याला चळवळीत यथोचित भूमिका घेणे शक्य होईल असे दाजिबांचे मत होते. कार्यकर्त्याने चळवळीच्या धोरणाशी, परिस्थितीशी, विरोधकाच्या डावपेचाशी तोंड देण्याची वैचारिक तयारी वाढविली पाहिजे तर श्रमीकांच्या राजकारणात कांही मार्ग सापडेल असे त्यांचे मत होते. उध्दवराव एखाद्या चळवळीच्या कुठल्याही कार्यक्रमात जवळ नसले तर इतर कार्यकर्त्यांची त्रेधातिरपट उडते असे दाजिबा देसाईंचे मत होते.(४५)

शेतमजूरांचा प्रश्न हा त्यांच्या आवडीचा विषय होय. त्यात ते स्वत:ला विसरून जातात. मजूरांची मजूरी वाढवावयाची झाली तरी मूळ शेतीतील उत्पन्न वाढले पाहिजे, त्यावरच मजूरांची वेतनवाढ अवलंबून आहे. श्रमाचा मोबदला कांही प्रमाणात धान्याच्या रूपाने दिला तरच मजूरी वाढेल. लहान शेतक-यांना मानाने जगण्यासाठी शेतीच्या आधुनिक ज्ञानाचा प्रसार व्हावयाला हवा त्याचप्रमाणे पाणी इतर साहित्य व बाजारात त्याच्या मालाला रास्त मोबदला मिळाला पाहिजे

शेतीमध्येच शेतक-याला शाश्वती मिळवून दिली पाहिजे तरच शेतक-यांची मुले शेतीवर स्थिर होतील व त्यामुळे नोक-या मागणा-यांचे प्रमाण कमी होईल असे त्यांचे मत होते. (४६)

शेतमजूराच्याकरिता त्यांनी अनेक लढे उभे केले आहेत. १९७२ च्या दुष्काळात लहान शेतकरी व शेतमजूर यांची स्थिती फार बिकट होती. त्यांच्यावर उपासमारीची पाळी आली होती. जनावरे जगविण्याचा फार मोठा प्रसंग शेतक-यावरती होता. दुष्काळ पडल्यामुळे शेतमजूरांना शेतीवर काम मिळणे अवघड होते. बाहेरही रोजगार उपलब्ध नव्हता तेंव्हा शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने महाराष्ट्रात जिल्हा व तालुक्याच्या ठिकाणी मोर्चे आयोजित करण्याचे धोरण ठरविले गेले. ठिकठिकाणी या पक्षामार्फत मोर्चे आयोजित करण्यांत आले. इस्लामपूर व वैराग येथे तर सरकारतर्फे काम मागायला आलेल्या लोकावर गोळीबार करण्यात आला. त्यांत कांही माणसे ठार झाली. उध्दवरावांच्या नेतृत्वाखाली उस्मानाबाद कलेक्टर कचेरीवर पंधरा हजार शेतकरी व शेतमजूराचा मोर्चा काढण्यात आला होता. त्यांनी काम व अन्न द्या मागणीचा आग्रह जिल्हयाधिका-यासमोर धरला. भाऊसाहेब वर्तक त्यावेळचे महाराष्ट्राचे मुंत्री यांची गाडी उध्दवरावांनी व लोकांनी अडविली त्याचा परिणाम मोर्चावर लाठीहल्ला व अश्रुधुराचा वापर करण्यांत आला. परंतु याचा परिणाम म्हणून सरकारला ताबडतोब कामे सुरु करावी लागली. (४७) आणिबाणीच्या काळात सोलापूर जिल्हयामधील सांगोला तालुक्यातील शेतमजूरांच्या आंदोलनाबद्दल त्यांना दोन महिन्याची शिक्षा झाली. (४८)

पक्षाने १९७२ च्या दुष्काळात शेतमजूर व लहान शेतकरी यांना रोजगार मिळवून देण्यासाठी संघटीत प्रयत्न केले आहेत.

मोर्चे, घेराव यासारखी आंदोलने केली. विधानसभेत इतर विरोधी पक्षाचे सहकार्य घेवून कामकाज बंद पाडण्याचेही प्रसंग निर्माण केले. या सर्वांचा परिणाम म्हणून सरकारला दुष्काळी कामे सुरु करावी लागली. रोजगार हमी योजना सुरू करावी लागली. मागेल त्याला काम मिळाले पाहिजे ही आग्रही भूमिका पक्षाच्यावतीने त्यांनी विधानसभेत मांडली. सुरुवातीला सरकार या मागणीस मंजूरी देण्यात तयार नव्हते परंतु सर्व विरोधी पक्षाच्या मदतीने सातआठ दिवस विधानसभेचे कामकाज बंद पाडले होते. सरकारला विधानसभेचे कामकाज सुरु ठेवण्यासाठी मागेल त्याला काम देणे भाग पडले. यामध्ये उध्दवरावाचा फार मोठा वाटा होता. (४९) महाराष्ट्रात रोजगार हमी योजना ही विरोधी पक्षामुळे सुरु झाली अशी कबुली डॉ. शेषराव वानखेडे यानी दिली होती. (५०)

श्रमीकांच्या चळवळीवर त्यांचा फार मोठा भरवसा होता. दलीतासाठी त्यांनी चळवळी केल्या आहेत. उस्मानाबाद व परभणी जिल्हयात दलीतांना प्रतिष्ठा मिळवून देण्यात त्यांचा फार मोठा सहभाग होता. दलीताना गावचे पोलीस पाटील केले पाहिजे अशी मागणी करणारे उध्दवराव हे महाराष्ट्रातले एकमेव नेते होते. (५१) उस्मानाबाद व परभणी जिल्हयात ज्या स्थानिक स्वराज्य संस्थात शेतकरी कामगार पक्षाचे बहुमत होते. त्या सहापैकी तीन नगरपरिषदाचे अध्यक्ष दलीत होते. उस्मानाबाद जिल्हयात असलेल्या ग्रामपंचायतीपैकी चाळीस टक्के ग्रामपंचायतीचे सरपंच दलीत आहेत. (५२) त्यांनी व त्यांच्या पक्षाने जातीचा विचार केला नाही. दलीताना समाजात प्रतिष्ठा मिळवून देण्यात त्यांनी फार मोलाची कामगिरी केली. नामांतराच्या प्रश्नावरुन मराठवाडयात सवर्णीकडून दलितांच्यावर हल्ले होण्यास सुरुवात झाल्यावर उध्दवराव खंबीरपणाने दलीतांच्या बाजूने उभे राहिलेले दिसतात. त्यांच्या या कार्यामुळे दलीत व मुस्लीम बांधवाचा पाठींबा उध्दवरावांना

सतत निवडणूकीमध्ये लाभत आलेला आहे. (५३)

महाराष्ट्र सरकार शेतमजूरासाठी किमान वेतन निर्धारित करुन देण्यास सुरुवातीला तयारच होत नव्हते. उध्दवरावानी व विरोधी पक्षातील सभासदानी विधानसभेत तेंव्हाचे कामगार मंत्री ना. नरेंद्र तिडके यांच्यावर सतत दबाव आणण्याचा प्रयत्न केला. विरोधी पक्षाचा वाढता दबाव लक्षात घेवून शेवटी महाराष्ट्र शासनाने शेतमजूराचे किमान वेतन ठरवून देण्याचे मान्य केले. परंतु सरकारने ठरवून दिलेले वेतन शेतमजूराना उपासमारीच्या छायेत ढकलणारे आहे. ते अतिशय अपूरे आहे. शिवाय हे वेतन लागू करणाऱ्या यंत्रणेचा अभाव आहे अशा या दोन्ही आपत्तीमध्ये राज्यातील ६0 लक्ष शेतमजूर सापडला आहे. जीवनावश्यक वस्तुंच्या किंमती व राहणीमानात ज्या प्रमाणात वाढ होईल त्याच्या आधारे शेतमजूराचे वेतन निश्चित केले पाहिजे असे त्यांचे मत होते. (५४)

## ४.५ सहकार चळवळीबद्दल उध्दवरावांचे मत :

सहकारी चळवळीबद्दल त्यांचे असे मत होते की, भारतात शेतीचे नियोजन केले गेले पाहिजे. कसेल त्याची जमीन हे सुत्र स्विकारले पाहिजे. बँका शेतकऱ्याना फार कमी कर्ज पुरवठा करतात. फक्त ६ % दराने १00 % कर्जपुरवठा या गरीब शेतकऱ्याला झाला पाहिजे. कष्टावर श्रीमंत होणारा शेतकरी आज संख्येने कमी होत चालला आहे. भांडवलशाही सरकारची दोन सुत्रे ठरलेली असतात . एक भांडवलदारांना अनुकूल आणि शेतकऱ्यांच्या विरोधात. परंतु ही जी धोरण आहेत ती मोडून काढण्यासाठी शेतकऱ्याला संघटीत करणे आवश्यक आहे. दुसरा

पर्याय बँकाचे कर्ज फार कमी व्याजाने देणे हा होय. शेतीमध्ये जर तंत्रज्ञान, नवज्ञान, विज्ञान येणे आवश्यक आहे. शेतीत जर तंत्रज्ञान, सायन्स, नवीन रासायनिक खाते आली नाहीत आणि शेतीच यांत्रिकीकरण केले नाही तर उत्पादनही वाढणार नाही व त्यामुळे गोरगरीब शेतक-याचे कल्याण होणार नाही. बैलही न परवडणारी बाब आहे. तेंव्हा शेतीचे यांत्रिकीकरण करीत असताना हा छोटा शेतकरी एकत्र करणे भाग आहे. परंतु दुदैवाने गेल्या पस्तीस वर्षात सहकार चळवळीला कॉंग्रेसने बदनाम केले आहे.(५५)

आवडी कॉंग्रेसच्या ठरावानुसार १९५७-५८ च्या अंदाज-पत्रकात सेवा सोसायटीतून सहकार शेती असे अर्थमंत्र्यानी सांगितले. तेंव्हाच त्यांनी सांगितले होते जमीनीची विषम होल्डींग असल्यामुळे ही सोसायटी श्रीमंत शेतक-यांना अधिक श्रीमंत करणारी ठरेल, गरीब शेतकरी अधिक गरिब होतील ही प्रक्रिया आता विकोपाला गेली आहे. या सोसायटीचे सभासद फक्त गरीब शेतक-यांना करा, श्रीमंत शेतक-यांना करू नका असे मी यशवंतराव चव्हाणांना सुचविले होते. सरकारची खरी गरज अल्पभूधारक, शेतमजूर व गरीब शेतक-यांना आहे. त्यांच्या विश्वासाला पात्र असणारी लिडरशीप सहकारातून निर्माण होणे हा खरा आजचा प्रश्न आहे.(५६)

सहकार चळवळ ही चांगली गोष्ट आहे. त्यात सर्वसामान्याची सहभागी झाले पाहिजे, असे त्यांचे मत होते. सहकारी चळवळीचा उद्देश चांगला आहे. परंतु दुर्दैवाने ती आज बदनाम ठरलेली चळवळ आहे. शेकडा साठ सोसायटया ह्या तोटयात आहेत यावरुन सहकार चळवळ ही सत्ताधा-यांची खाण्याची कुरणे बनली आहेत. पश्चिम महाराष्ट्रात विशेषत: कोल्हापूर सांगली या भागात सहकार चळवळ कांही प्रमाणात यशस्वी ठरली आहे. परंतु मराठवाडयात मात्र सहकार चळवळ मुळातच

खावून टाकली आहे असे त्यांचे स्पष्ट मत होते.(५७)

ज्या ठिकाणी जमीनीची धारणा, मालकी हक्क विषम आहेत तिथ सहकार चळवळीमुळे ही विषमतेची दरी अधिक वाढते. आणि त्या दरीतून तळागाळातल्या वर्गाच्या संघर्षाच्या भावना या अधिक प्रखर होतात. कर्जपुरवठयाकडे ही चळवळ गेलेली नाही. सहकार चळवळीमुळे फार मोठा बदल झाला असे मी मानीत नाही. सहकारी साखर कारखान्यावरती पाच पन्नास श्रीमंत शेतक-यांच्या घराण्याचे की ज्यांना जोडधंदा आहे अशाचेंच वर्चस्व आहे. ज्याप्रमाणे ऊस चरख्यात घातला जातो त्याप्रमाणे साखर कारखान्याचा सभासद चरखाच असतो. साखर कारखान्याच्या पुढा-यांच्या मेहेर नजरेवर त्याला अवलंबून रहावे लागते. दोन महिने ऊस उशिरा नेला तर वजन कमी भरते, खर्च वाढतो. त्यामुळे शेतकरी गुलामासारखे भित्रे असतात. सहकार क्षेत्रामुळे त्यांचा स्वाभिमान वाढलाय किंवा फार मोठया प्रगतीवर गेलाय असे नाही पण ते गुलाम झालेले आहेत. बँक एकराप्रमाणे कर्ज देते. जमीनीचे होल्डींग विषम आहे तेंव्हा विषम समाज रचनेमध्ये सहकार क्षेत्रातून समाजवाद येण्याची " को-ऑपरेटीव्ह कॉमनवेल्थ " ही कल्पना मुठमातीला गेली आहे. उलट अधिक गतीने विषमतेची दरी वाढत चालली आहे.(५८) जोपर्यंन्त विषम जमीन धारणा आहे तोपर्यंन्त किरकोळ दुरूस्त्या करून भागणार नाही. ज्या भागात सहकाराची चळवळ नाही, कॅनॉल नाही तिथे सहकार क्षेत्राच्या परिसरामपेक्षा विषमतेची चिन्ह आपणाला कमी दिसतील.

आपल्या देशात सहकार हा एक विनोदी विषय बनला आहे. या तथाकथित सहकाराने ज्यांचे उखळ पांढरे झाले त्यानी सुरूवातीपासूनच सहकार चळवळीचे गोडवे गायीले आहेत. परंतु या

सहकाराची गंगा तहानलेल्यापर्यन्त येवून पोहोचलीच नाही असे त्यांचे मत होते. सहकारी चळवळीबद्दल सरकारने विधानसभेत विधेयक मांडल्यावर त्यावर भाष्य करताना त्यांनी म्हटले की, सरकारने या चळवळीत असलेले दोष अत्यंत प्रामाणिकपणे कबूल केलेले आहेत. चळवळ शुध्द व्हावी, चांगली चालावी या चळवळीतून लोकांची सेवा व्हावी, अशी सदिच्छा सरकारने व्यक्त केली आहे. यातील कांही तरतुदी ही चळवळ शुध्द करण्याच्यादृष्टीने घालण्यात आलेल्या आहेत. परंतु सहकारी संस्थांचे ऑडीट रिपोर्टस् पाहिले व डेप्युटी रजिस्ट्रारने सहकारी संस्थांची यादी केली तर संस्थापासून अनेक सदस्यापर्यन्त असे सांगण्याची पाळी येईल की, पुन्हा आम्ही अशा गैर गोष्टी करणार नाहीत. खरा प्रश्न आहे की, आपले अधिकार वापरू शकतील असे डेप्युटी रजिस्ट्रार आता तरी सरकार निर्माण करणार आहे काय तो. केवळ कायदा केल्याने पंचायत समित्या, ग्रामपंचायती आणि सहकारी चळवळी यातील लाचलुचपत व भ्रष्टाचार आपल्याला दूर करता येणार नाही असे त्यांचे स्पष्ट मत होते. सहकार चळवळीमध्ये काम करणा-या मंडळीचे राज्यकर्त्यांवर दडपण असते त्यामुळे राज्यकर्ते त्यांच्या ठिकाणी असलेला भ्रष्टाचार व लाचलुचपत नाहीशी करू शकत नाहीत. सदर विधेयकाचा हेतु चांगला आहे परंतु त्याच्या अंमलबजावणीच्या मार्गात अडथळा आणणारीही आपलीच यंत्रणा आहे. जो माणूस पंचायतीसारख्या संस्थात, सहकारी संस्थात डिफॉल्ट करील त्याला आम्ही सामाजिक प्रतिष्ठा देणार नाही हे कबुल करण्याची आपली तयारी आहे काय ? जोपर्यन्त अशा लोकावर आपण सामाजिक दडपण निर्माण करीत नाही तोपर्यन्त या तरतुदींचा कांही एक उपयोग होणार नाही असे त्यांचे स्पष्ट मत होते.[५९] मा. मुख्यमंत्री श्री.शरद पवार यांनीसुध्दा म्हटले आहे, सहकारी क्षेत्रातसुध्दा ऋषीतुल्य माणसे भ्रष्टाचार करण्यात गुंतलेली दिसून येतात.[६०]

## ४.६ भूदान चळवळीबद्दल त्यांचे मत :

उध्दवराव पाटील यांच्या दूरदृष्टीचे एक उत्तम उदाहरण म्हणजे भारतात विनोबा भावे यांनी जी भूदान चळवळ सुरु केली होती तिला जाहीरपणे विरोध करणारे उध्दवराव हे पाहिले होते. संयुक्त महाराष्ट्र समितिचे इतर नेते तेंव्हा उध्दवरावाना विनोबा भावेनी चालविलेल्या भूदान चळवळीला विरोध न करण्याचा सल्ला देत होते. संबंध देशात जाहीरपणे भूदान चळवळ हे थोतांड असल्याची जाहीर टिका शेतकरी कामगार पक्षाने केली होती. थोडयाच दिवसात संत विनोबा भावे यांचे पितळ उघडे पडले नि उध्दवरावाना टिका न करण्याचा सल्ला देणारी समितीतील पुढारी मंडळीच उध्दवरावांच्या दूरदृष्टीचे कौतुक करू लागली. आचार्य अत्रे यांनी त्यावेळी विनोबा का वानरोबा हा अग्रलेख दै. मराठामध्ये लिहिला होता.(६१)

विनोबा भावेच्या भूदान चळवळीला विरोध करणारे उध्दवराव हे खरे मुलगामी व पुरोगामी विचार करणारे आणि गरिब शेतकरी, शेतमजूरांची बाजू घेणारे होते. भूदान चळवळीचे प्रनेते विनोबा भावे महाराष्ट्रात प्रवेश करताना त्यांच्या स्वागताला समितीच्या नेत्यांनी जावे असे ठरले. मुख्यमंत्र्यांनी उध्दवरावाना स्वागताला जाण्याचे सुचविले परंतु उध्दवरावानी त्याबाबतीत विरोध केला. अनेकांनी त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न केला पण सर्व असफल ठरले. आंध्र प्रदेशातील कम्युनिस्ट चळवळीत एक हजार एकर जमीन गेलेल्या रामचंद्र रेड्डीने १०० एकर जमीन दान देवून ९०० एकर जमीन मजूरापासून वाचविली. भूदान चळवळ ही सरंजामदारांना, जमीनदाराना प्रशस्तीपत्र देणारी चळवळ आहे असे त्यांचे स्पष्ट मत होते. विनोबांच्या स्वागतालाही ते गेले नाहीत. परंतु पुढे उस्मानाबादला विनोबा आले असताना ते खाजगी भेटीस गेले. विनोबानी उध्दवरावांच्या व शेतकरी कामगार पक्षाच्या प्रामाणिकपणाबद्दल कौतुक केले.(६२)

# प्रकरण ४ थे

## संदर्भ सूची

उध्दवराव पाटील आणि त्यांनी चालविलेल्या विविध राजकीय चळवळी :


४.१ उध्दवराव पाटील यांचे कार्यक्षेत्र :

१) तापडीया सुरेश - " झुंजार सेनानी " प्रकाशक - बजाज उद्योग समुह लातूर पृष्ठ ४

२) प्रा. कल्याणकर बा. ह. - " संघर्ष " प्रकाशक खा. बाळासाहेब पवार, औरंगाबाद पृष्ठ २३

३) ना. खापले माणिकराव माजी आमदार तुळजापूर यांचे मुलाखती आधारे.

४) प्रा. कल्याणकर बा. ह. - युगकर्ती त्रैमासिक औरंगाबाद एप्रिल-मे-जून १९८७ पृष्ठ १२

५) श्री. ॲड. देशमुख राजेंद्र उस्मानाबाद यांचे मुलाखाती आधारे

६) श्री. देशमुख एम. डी. उस्मानाबाद यांचे मुलाखाती आधारे

४.२ संयुक्त महाराष्ट्राची चळवळ :

७) सत्यनवेशी - " संयुक्त महाराष्ट्राचे महाभारत " साधना प्रकाशन पुणे १९५८ पृष्ठ ३

८) पेंडसे लालजी - " महाराष्ट्राचे महामंथन " साहित्य सहकार संघ प्रकाशन मुंबई पृष्ठ ८३


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

९) उक्त पृष्ठ ८७

१०) सत्यनवेशी - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ ९

११) पेंडसे लालजी - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ ११२

१२) उक्त पृष्ठ ३११

१३) उक्त पृष्ठ ३४५

१४) "सकाळ" २४ नोव्हेंबर १९५५ फडके यांनी नमुद केलेल्या विधानाच्या आधारे - "केशवराव जेधे" पृष्ठ २५४

१५) पेंडसे लालजी - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ ३८०

१६) उक्त पृष्ठ ४०३

१७) प्रा. भांडवलकर एस. एस. " राजधर्म " दैनिक लातूर १२-७-१९८७ च्या लेखा आधारे

१८) प्रा. कल्याणकर बा. ह. "संघर्ष " प्रकाशक खा. बाळासाहेब पवार औरंगाबाद पृष्ठ १३

१९) उक्त पृष्ठ १२

२०) उक्त पृष्ठ १०

२१) उक्त पृष्ठ ३३

२२) उक्त पृष्ठ ५

२३) उक्त पृष्ठ ७

२४) उध्दवरावाच्या ध्वनीमुद्रीत भाषणाच्या आधारे.

४.३ <u>उध्दवरावानी शेतक-यासाठी चालविलेल्या चळवळी</u> :

२५) अॅड. देशमुख राजेंद्र उस्मानाबाद यांचे मुलाखती आधारे

२६) उक्त

२७) प्रा. कल्याणकर बा. ह. – उपरिनिर्दिष्ट (संघर्ष) पृष्ठ २४

२८) ॲड. देशमुख राजेंद्र उस्मानाबाद यांचे मुलाखती आधारे

२९) प्रा. कल्याणकर बा. ह. – उपरिनिर्दिष्ट (संघर्ष) पृष्ठ ९

३०) ॲड. देशमुख नरसिंगराव यांच्या मुलाखती आधारे

३१) प्रा. कल्याणकर बा. ह. –उपरिनिर्दिष्ट (संघर्ष) पृष्ठ ९

३२) श्री देशमुख एम. डी. उस्मानाबाद यांचे मुलाखती आधारे

३३) श्री उध्दवराव पाटील यांच्या विधानसभेतील भाषणाच्या आधारे १४ फेब्रुवारी १९६१

३४) उक्त ६ फेब्रुवारी १९६१

३५) उक्त २३ ऑक्टोबर १९५८

३६) श्री. खपले माणिकराव माजी आमदार तुळजापूर यांचे मुलाखती आधारे

३७) उक्त

३८) श्री देशमुख एम. डी. उस्मानाबाद यांचे मुलाखती आधारे

३९) श्री नलावडे जयसिंगराव उस्मानाबाद यांचे मुलाखती आधारे

४०) श्री पाटील रघुनाथ राजाराम माजी सरपंच पांगरी ता. बार्शी यांचे मुलाखती आधारे

४१) तापडीया सुरेश – उपरिनिर्दिष्ट पृष्ठ ९०

४२) ॲड. देशमुख राजेंद्र उस्मानाबाद यांचे मुलाखती आधारे

४३) उध्दवराव पाटील यांच्या विधानसभेतील भाषणाच्या आधारे ११ ऑक्टोबर १९७१

## ४.४ शेतमजूरासाठी चालविलेल्या चळवळी :


४४) माजगांवकर श्री. ग. – " साप्ताहिक माणूस " ४ फेब्रुवारी १९७८ पृष्ठ ११–१२

४५) प्रा. कल्याणकर बा. ह. – उपरिनिर्दिष्ट (संघर्ष) पृष्ठ ३–४

४६) माजगांवकर श्री. ग. – उपरिनिर्दिष्ट पृष्ठ ६

४७) श्री. खापले माणिकराव माजी आमदार तुळजापूर यांच्या मुलाखती आधारे

४८) माजगांवकर श्री. ग. – उपरिनिर्दिष्ट पृष्ठ ५

४९) श्री. खापले माणिकराव – माजी आमदार तुळजापूर यांचे मुलाखती आधारे.

५०) माजगांवकर श्री. ग. उपरिनिर्दिष्ट पृष्ठ ३५

५१) श्री. खापले माणिकराव – माजी आमदार तुळजापूर यांचे मुलाखती आधारे.

५२) देशमुख एम. डी. – उस्मानाबाद यांचे मुलाखती आधारे

५३) श्री. खापले माणिकराव माजी आमदार तुळजापूर यांचे मुलाखती आधारे

५४) ॲड. देशमुख नरसिंगराव उस्मानाबाद यांचे मुलाखती आधारे.


## ४.५ सहकारी चळवळीबद्दल त्यांचे मत :


५५) प्रा. कल्याणकर बा. ह. यांनी उध्दवरावांची घेतलेली ध्वनीमुद्रांकित मुलाखती आधारे.

५६) उक्त

५७) श्री. खपले माणिकराव माजी आमदार तुळजापूर यांचे मुलाखती आधारे.

५८) प्रा. कल्याणकर बा. ह. उपरिनिर्दिष्ट मुलाखती आधारे.

५९) उध्दवराव पाटील यांच्या विधानसभेतील भाषणांच्या आधारे ३ एप्रिल १९६९.

६०) दैनिक सकाळ २०.११.१९८८ च्या आधारे.

४.६ भूदान चळवळीबद्दल त्यांचे मत :

६१) प्रा. कल्याणकर बा. ह. उपरिनिर्दिष्ट (संघर्ष) पृष्ठ ३३

६२) तापडीया सुरेश - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ ८